**ठळक बातम्या**

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ३ रुपये तर सीएनजीच्या दरात २ रुपये वाढ

- नीट युजी परीक्षा आता येत्या २१ जून रोजी होणार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पाच देशांच्या दौऱ्यावर रवाना/ संयुक्त अरब अमिरातीत झालं पारंपरिक स्वागत

**आणि**

- प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचं निधन

**<><><><><>**

जागतिक स्तरावर झालेल्या इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांनी वाढ केली आहे. त्यामुळे दिल्लीत आता पेट्रोलचा दर प्रतिलीटर ९७ रुपये ७७ पैसे, तर डिझेलचा दर ९० रुपये ६७ पैसे झाला आहे. मुंबईत साध्या पेट्रोलचा दर वाढून प्रती लीटर १०६ रुपये ६८ पैसे तर डिझेलचा दर प्रती लीटर ९३ रुपये १४ पैसे झाला आहे.

दिल्ली आणि मुंबईत  सीएनजीच्या दरातही प्रतिकिलो २ रुपये वाढ झाली आहे. त्यामुळे दिल्लीत आता सीएनजी प्रतिकिलो ७९ रुपये ९ पैसे दराने उपलब्ध होईल. मुंबईत सीएनजीचा दर प्रतिकिलो ८४ रुपये झाला आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत आयोजित ब्रिक्स राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्ताराची मागणी केली आहे. परिषदेत सुधारणा न केल्यास संस्था म्हणून तिच्या विश्वासार्हतेवर मर्यादा येतील, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर म्हणाले. या संस्थेची निर्मिती ज्या काळात झाली होती, त्यापेक्षा आजचं जग अधिक विस्तारलेलं, परस्परांशी जोडलेलं, गुंतागुंतीचं आणि बहुध्रुवीय आहे. आणि संस्थेची मूळ संरचना या बदलाशी जुळवून घेऊ शकलेली नाही, असंही जयशंकर यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी आज इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघाची यांची आज नवी दिल्ली इथं भेट घेतली. पश्चिम आशियातल्या संघर्षाबाबत यावेळी चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. अराघाची यांच्या ब्रिक्स परराष्ट्रमंत्र्यांच्या परिषदेतल्या सहभागाबद्द्ल जयशंकर यांनी संतोष व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट युजी २०२६ ही परीक्षा येत्या २१ जून रोजी पुन्हा घेतली जाणार असल्याचं राष्ट्रीय परिक्षा संस्था –NTA ने आज जाहीर केलं. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली काल रात्री झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ मिनिटे अतिरीक्त वेळ दिला जाईल, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज जाहीर केलं. नवी दिल्लीत घेतलेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

नीट च्या परीक्षा पद्धतीमध्ये पुढील वर्षीपासून बदल करणार असल्याचं प्रधान यांनी सांगितलं. ते म्हणाले की, ओएमआर पद्धतीनं घेतली जाणारी नीट-यूजी परीक्षा पुढील वर्षापासून संगणक आधारित अर्थात सीबीटी पद्धतीनं घेतली जाणार आहे. २१ जून ला घेतल्या जाणाऱ्या नीट युजी परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांना १४ जून पर्यंत प्रवेशपत्रं दिली जातील असंही त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड धर्मेंद्र प्रधान बाईट - - -**

एनटीएमध्ये ठोस सुधारणा करण्याची गरज असून भविष्यात कोणत्याही प्रकारच्या अनियमितता टाळण्यासाठी परीक्षा व्यवस्थेला अधिक मजबूत करण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, असं प्रधान यांनी सांगितलं. सरकार विद्यार्थ्यांबद्दल संवदेनशील असून त्यांच्या हिताला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं प्रधान यांनी सांगितलं. ३ मे रोजी झालेल्या नीट प्रश्नपत्रिका फुटल्याप्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, याचा पुनरुच्चार प्रधान यांनी केला.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे साऱ्या जगालाच इंधन दरवाढीला तोंड द्यावं लागत आहे. इतर देशांमधे इंधनाच्या दरात २० ते १०० टक्के वाढ झाली असताना भारतात केवळ टक्के वाढ झाली असल्याचं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटलं आहे.

इंधनाच्या दरातली वाढ केंद्रसरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे झाली असल्याचा आरोप राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहा दिवसांच्या संयुक्त अरब अमिराती (**UAE),** नेदरलँड्स**,** स्वीडन**,** नॉर्वे आणि इटली या पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. या दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात ते संयुक्त अरब अमिरातींत राष्ट्राध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नह्यान यांची भेट घेणार आहेत. दुबई इथं प्रधानमंत्र्यांचं पारंपरिक मानवंदना देऊन स्वागत करण्यात आलं. दौऱ्यादरम्यान भारताचे विविध देशांसोबत द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत पूर्ण झालेल्या पाच लाख घरांमध्ये आज लाभार्थ्यांचा गृहप्रवेश होत आहे. सातारा इथं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत सहा लाभार्थ्यांना घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या जात आहेत. यामध्ये तीन कोटी घर पूर्ण करणाऱ्या लाभार्थ्यांचा समावेश आहे.

दरम्यान, शिवराजसिंह चौहान यांचं आज सकाळी सातारा इथं आगमन झालं. बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी त्यांचं स्वागत केलं. सातारा पालिकेने उभारलेल्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं.

**<><><><>**

पश्चिम बंगालमधे भाजपाचे आमदार रथिंद्र बासू यांची विधानसभा अध्यक्षपदी निवड झाली आहे. मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांनी रथिंद्र बासू यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला**,** आणि आवाजी मतदानाने तो मंजूर झाला.

**<><><><>**

ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ आणि लेखक डॉ.आनंद नाडकर्णी यांचे आज सकाळी मुंबईतील एका रुग्णालयात प्रदीर्घ आजारानं निधन झाले. ते ६७ वर्षांचे होते. नाडकर्णी यांच्या निधनाने साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर ठाण्यात अंत्यसंस्कार होणार आहेत.

डॉ. आनंद नाडकर्णी यांनी १९८० मध्ये एम.बी.बी.एस ची पदवी घेतली. त्यानंतर १९८४ मध्ये मानसोपचारशास्त्रामध्ये एम.डी. ही पदवी मिळवली. व्यसनमुक्ती, तरुण आणि किशोरांची जडणघडण या क्षेत्रात त्यांनी जनजागृतीचं भरीव कार्य केलं.

मानसोपचाराला सामाजिक बांधिलकी मानून दीपस्तंभासारखं कार्य करणाऱ्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला आपण मुकलो आहोत, अशा शब्दांत **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी श्रद्धांजली वाहिली.

असीम उर्जा आणि प्रसन्न व्यक्तिमत्व असलेले ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी यांच्या निधनाचे वृत्त धक्का देणारे असल्याचं **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे. डॉ.नाडकर्णी यांनी मानसिक आरोग्याविषयी समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आयुष्यभर अत्यंत संवेदनशीलतेने आणि समर्पित भावनेनं कार्य केले. मानसिक आरोग्य क्षेत्रात त्यांनी केलेलं काम समाजासाठी कायम प्रेरणादायी असेल, अशा शब्दांत **उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार** यांनी आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

अरावली पर्वतरांगांमधल्या वाढत्या खाणींना पर्यावरणवाद्यांचा तीव्र विरोध लक्षात घेऊन सध्या खाणकाम भाडेपट्टी कंपन्यांच्या बाजूने कोणताही आदेश काढणार नसल्याचं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. अरावली पर्वतरांगांची व्याख्या स्पष्ट करणे आणि इतर बाबींसंदर्भात न्यायालयाने स्वतःहून दखल घेतलेल्या याचिकेवर आज सुनावणी झाली. खाणकामासंदर्भातला भाडेकरार रद्द केल्यास ती कंपनी न्यायालयात जाऊ शकते असा दावा वकीलांनी केला. मात्र हा संवेदनशील प्रश्न असल्यामुळे ही सुनावणी टप्प्याटप्प्यात न करता याबाबतीतली संपूर्ण तथ्य समोर आल्यावरच करता येईल. असं सरन्यायाधीश न्यायमुर्ती सुर्यकांत आणि न्यायमुर्ती जोयमाला बागची यांच्या खंडपीठानं स्पष्ट केलं. अरावली पर्वतरांगांमधले पर्यावरणीय दाव्यांसंदर्भात त्या क्षेत्रातले तज्ञांची नावे देण्याची सूचना पर्यावरण मंत्रालयाला फेब्रुवारीतच केल्याचंही खंडपीठानं यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताच्या पी. व्ही. सिंधुचा सामना आज जपानच्या अकाने यामागुची बरोबर होत आहे. पुरुष एकेरीत लक्ष्य सेनचा सामना गाठ उपांत्यपूर्व फेरीत थायलंडच्या खेळाडूबरोबर होणार आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात गेल्या ३६ तासांत झालेल्या पाऊस, वादळ आणि वीज पडण्याच्या घटनांमध्ये १११ जणांचा मृत्यू झाला. तर २०० हून अधिक जखमी झाले. जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन तातडीनं पाहाणी करण्याचे निर्देश मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी दिले आहेत. वेगाने वाहाणाऱ्या वाऱ्यांमुळे रेल्वे रुळांवर झाडं पडल्यानं त्याचा फटका पाटणा राजधानी एक्स्प्रेससह अनेक गाड्यांना बसला आहे.

**<><><><><>**

उझबेकिस्तानमध्ये ताश्कंद इथं पार झालेल्या आशियाई मुष्टियुद्ध पंधरा वर्षांखालील मुलांच्या अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं 9 सुवर्ण, 6 रौप्य आणि 12 कास्य अशी 27 पदकांची कमाई केली.

//<><><><><>//